PRC/PR/21/2025

## Inauguration of Bhayanderpada Flyover on Ghodbunder Road successfully completed

## Relief from Traffic Congestion; Crucial Link for Routes Leading to Gujarat, Thane, and Vasai-Virar

**Thane, 14 May 2025**

The much-awaited Bhayanderpada Flyover, crucial for managing Thane's traffic flow, was inaugurated today at the hands of Hon'ble Deputy Chief Minister Shri Eknath Shinde. Hon'ble Transport Minister Shri Pratap Sarnaik and senior officials from MMRDA were also present at the event.

A key highlight of this flyover is that it has been constructed on the viaduct of Metro Lines 4 and 4A, ensuring optimal land usage and seamless integration between road and metro systems. Once metro services begin in the future, residents in the area will have easy access to metro stations.

This project is expected to significantly streamline and accelerate traffic movement for vehicles traveling between Thane, Bhiwandi, Navi Mumbai, JNPT, Borivali, Vasai-Virar, and Gujarat.

**Key Project Highlights:**

- Total Ramp Length: 601 meters
  (Thane end – 391.48 m, Underpass – 20.4 m, Borivali end – 189.88 m)
- Carriageway: 2+2 lanes (7.5 m + 7.5 m)
- Underpass: 2 x 2 lanes (Length 20.4 m x Width 19.7 m)
- Traffic Volume: Approximately 73,333 PCUs

**Strategic Benefits:**

- Ghodbunder Road serves as a critical interstate freight corridor from Gujarat to JNPT.
- Traffic congestion between Gaimukh and Waghbil is expected to be significantly reduced.
- The current burden caused by heavy goods vehicles and daily office commuters on this road will be eased.

- The flyover will reduce overall travel time and improve average driving speed.

**Direct Benefits for Local Residents:**

Residents of Thane East, Ghodbunder Road, Gaimukh, Kasarvadavali, Brahmand, Waghbil, and Bhayanderpada will experience direct benefits. Daily commuting will become faster, safer, and more convenient.

Additionally, a dedicated subway has been constructed beneath the flyover for pedestrians and local traffic to cross both sides of Ghodbunder Road safely. This will reduce pressure on the flyover itself and help eliminate bottlenecks between Gaimukh and Waghbil, leading to faster and less polluted traffic movement on the Ghodbunder stretch.

Hon'ble Chief Minister Shri Devendra Fadnavis said:

**This project is not just a road—it's a transformation in lifestyle that brings relief to the people of Thane. The improvement on a crucial route like Ghodbunder Road will not only streamline traffic but also act as a catalyst for the overall development of the region. It is a great example of how reducing traffic congestion can save both time and fuel.**

Dr. Sanjay Mukherjee, IAS, Metropolitan Commissioner, MMRDA, said:

**The inauguration of the Bhayanderpada underpass is a significant step toward creating a sustainable and efficient transport system in the Mumbai Metropolitan Region. This project will not only improve traffic flow but also boost economic and industrial activity. We are prioritizing ease and safety in the daily commute of citizens.**

---

## घोडबंदरवरील भाईंदरपाडा उड्डाणपुलाचा लोकार्पण सोहळा संपन्न

## वाहतूक कोंडीला दिलासा, गुजरात ठाणे आणि वसई-विरारकडे जाणाऱ्या मार्गावर महत्त्वाची जोडणी

**ठाणे, १४ मे २०२५**

ठाणे शहराच्या वाहतूक दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या भाईंदरपाडा उड्डाणपुलाचा लोकार्पण सोहळा आज मा. उपमुख्यमंत्री आणि एमएमआरडीएचे अध्यक्ष, श्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते पार पडला. या कार्यक्रमास मा. श्री प्रताप सरनाईक, परिवहन मंत्री, तसेच एमएमआरडीएचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या उड्डाणपुलाची विशेष बाब म्हणजे तो मेट्रो लाईन 4 व 4A च्या व्हायाडक्टवर उभारण्यात आला आहे, त्यामुळे एकाच जागेचा प्रभावी वापर करून रस्ते आणि मेट्रो यांच्यातील समन्वय साधण्यात आला आहे. भविष्यात मेट्रो सेवा सुरू झाल्यावर या भागातील रहिवाशांना सहजपणे मेट्रो स्थानकांपर्यंत पोहोचता येणार आहे.

या प्रकल्पाद्वारे ठाणे, भिवंडी, नवी मुंबई, जेएनपीटी तसेच बोरिवली, वसई-विरार आणि गुजरातकडे जाणाऱ्या वाहनांसाठी वाहतूक अधिक सुरळीत आणि जलद होणार आहे.

**प्रकल्पाची ठळक वैशिष्ट्ये:**

- उड्डाणपुलाची एकूण रॅम्प लांबी: 601 मीटर
  (ठाणे कडील बाजू - 391.48 मी, भुयारी मार्ग - 20.4 मी, बोरिवली कडील बाजू - 189.88 मी)
- मार्गिका: 2+2 (7.5 मीटर + 7.5 मीटर)
- भुयारी मार्ग: 2 x 2 लेन (लांबी 20.4 मी x रुंदी 19.7 मी)
- वाहन घनता: अंदाजे 73,333 PCU

**धोरणात्मक फायदे:**

- घोडबंदर रस्ता हा गुजरात ते जेएनपीटी दरम्यानच्या आंतरराज्यीय जड वाहन वाहतुकीसाठी कणा आहे.
- या मार्गावरच्या गायमुख ते वाघबिल दरम्यानची वाहतूक कोंडी आता लक्षणीयरीत्या कमी होणार आहे.
- जड वाहने आणि ऑफिस प्रवासी यांच्यामुळे या रस्त्यावर नेहमी ताण असतो, तो आता कमी होईल.
- उड्डाणपुलामुळे प्रवासाचा वेळ कमी होऊन, सरासरी वेग वाढेल.

**स्थानिक नागरिकांसाठी प्रत्यक्ष फायदे:**

या प्रकल्पामुळे ठाणे पूर्व, घोडबंदर रोड, गायमुख, कासारवडवली, ब्रह्मांड, वाघबिल आणि भाईंदरपाडा परिसरातील नागरिकांना प्रत्यक्ष फायदा होणार आहे. दररोजचा प्रवास जलद, सुरक्षित आणि सुलभ होईल.

याशिवाय, या प्रकल्पात स्थानिकांना घोडबंदरच्या डाव्या उजव्या बाजुला जाता यावे म्हणून स्वतंत्र भुयारी मार्ग (Subway) सुद्धा बांधण्यात आला आहे. त्यामुळे वरच्या उड्डाणपुलावरील सामान्य वाहतुकीवरील ताण कमी होईल. परिणामी, गायमुख ते वाघबिल दरम्यानची वाहतूक कोंडी सुटेल, आणि घोडबंदर रस्त्यावरील वाहतूक अधिक गतिमान आणि प्रदूषणमुक्त होईल.

मा. उपमुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे म्हणाले:

**ठाणेकरांना दिलासा देणारा हा प्रकल्प म्हणजे केवळ रस्ता नव्हे, तर जीवनशैलीतला बदल आहे. घोडबंदरसारख्या महत्त्वाच्या रस्त्यावर झालेली ही सुधारणा ही वाहतूक सुरळीत करण्यासोबतच संपूर्ण क्षेत्राच्या विकासासाठी प्रेरक ठरेल. वाहतूक कोंडी कमी करून वेळ आणि इंधन वाचवण्याचे हे एक उत्तम उदाहरण आहे.**

डॉ. संजय मुखर्जी, आयएएस, महानगर आयुक्त, MMRDA म्हणाले:

**"भाईंदरपाडा उड्डाणपुलाचा लोकार्पण सोहळा ही मुंबई महानगर प्रदेशाच्याच्या शाश्वत आणि कार्यक्षम वाहतूक व्यवस्थेच्या दिशेने घेतलेली महत्त्वपूर्ण पावले आहेत. या प्रकल्पामुळे केवळ वाहतुकीचा वेग वाढणार नाही, तर आर्थिक आणि औद्योगिक हालचालींनाही चालना मिळेल. नागरिकांच्या दैनंदिन प्रवासात सुलभता आणि सुरक्षितता यांना आम्ही प्राधान्य देत आहोत.**

---




Rumah Bali
849 3379






WINE SHOP
ANI
जय महाराष्ट्र
18
NEWS 18
SPU, Mumbai

